ePaper


## भारतात पहिल्यांदाच सापडले ‘जिहादी ड्रग’! अमित शाह यांची माहिती



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 17 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




पान 2 वरुन...

बाणेरमध्ये महापालिकेचे कर्करोग रुग्णालय!

### 2400 किमी पाइपलाइनद्वारे LPG पुरवठा; होर्मुझ सामुद्रधुनीवरील अवलंबित्व कमी होणार

# ओमानमार्गे भारतात थेट 'गॅस पाइपलाइन'

महाईन्यूज ।
नवी दिल्ली

**भारतात एक लोकप्रिय म्हण आहे की, ‘भविष्याचा उपाय संकटातच दडलेला असतो, तुम्हाला फक्त शोधायचा आहे.’ इराण युद्धामुळे ऊर्जा मार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारा तेल आणि वायू पुरवठा विस्कळीत झाल्यानंतर भारत आता एका मोठ्या प्रकल्पावर काम करत आहे. अंदाजे 40,000 कोटी रुपयांचा प्रकल्प यशस्वी झाला, तर भारताला येत्या अनेक दशकांपर्यंत गॅस तुटवड्याचा सामना करावा लागणार नाही.**




पश्चिम आशियात अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे तेल आणि गॅसचा पुरवठा खंडित झाला असून कच्च्या तेलाप्रमाणे भारताकडे सामरिक गॅसचा साठा नाही. अशा परिस्थितीत, भारत आता साठवणूक क्षमता वाढवण्यासाठी आणि आखाती देशांकडून वायू आयात करण्याच्या प्रकल्पांवर काम करत आहे.

भारत आपल्या तेल आणि गॅसचा बहुतांश भाग आखाती देशांकडून आयात करतो पण, भविष्यात अशी परिस्थिती टाळण्यासाठी सरकार आता एका प्रकल्पावर काम करत आहे. या प्रकल्पांतर्गत ओमानपासून भारतापर्यंत समुद्राखालून गॅस पाइपलाइन बांधली जाईल आणि यासाठी अंदाजे 40,000 कोटी रुपये खर्च अपेक्षित असून हा प्रकल्प पूर्ण होण्यास पाच ते सात वर्षे लागू शकतात.

पेट्रोलियम मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांचा हवाला देत इकॉनॉमिक टाइम्सच्या अहवालात सरकार GAIL, इंजिनियर्स इंडिया आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशन यांना सविस्तर व्यवहार्यता अहवाल तयार करण्यास सांगू शकते असा दावा केला गेला आहे. 'द साऊथ एशिया गॅस एंटरप्रायझेस' या खाजगी क्षेत्रातील समूहाने एक पूर्व-व्यवहार्यता अभ्यास सादर केला असून सरकार त्याचा अभ्यास करत आहे. एका अधिकाऱ्याने सांगितले की, भारताने स्पॉट मार्केटमधून गॅस खरेदीवरील अवलंबित्व कमी केले पाहिजे आणि पश्चिम आशियातून येणारी एक समर्पित पाइपलाइन देशाची ऊर्जा सुरक्षा वाढवेल.



## ओमानपासून थेट गुजरात पाईपलाईन

प्रस्तावित मध्य पूर्व-भारत खोल-जल पाइपलाइन (MEIDP) सुमारे 2000 किलोमीटर लांबीची असेल आणि अरबी समुद्राखालून ओमानला थेट गुजरातच्या किनाऱ्याशी जोडेल. या पाइपलाइनमुळे दररोज सुमारे 31 दशलक्ष घनफूट नैसर्गिक गॅसचा पुरवठा शक्य होईल. तसेच या प्रकल्पाचा मार्ग भू-राजकीयदृष्ट्या संवेदनशील भागांना टाळून ओमान आणि युएईमधून जाईल अशाप्रकारे आखला जाईल. या पाइपलाइनमुळे भारताला ओमान, संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, इराण, तुर्कमेनिस्तान आणि कतार यांसारख्या देशांमधील प्रचंड वायू साठ्यांपर्यंत पोहोचता येईल जिथे सुमारे 2500 ट्रिलियन घनफूट गॅसचा साठा आहे.



## इराण युद्धामुळे भारतात ऊर्जा संकट

पश्चिम आशियातील तणावामुळे आशिया ते युरोपपर्यंतच्या ऊर्जा पुरवठा साखळीत गंभीर व्यत्यय निर्माण झाला असून याचा भारतालाही धक्का बसला. भारत ऊर्जेवर अवलंबून असलेला देश असून आपल्या गरजेचा बहुतांश तेल आणि गॅस आखाती देशांकडून आयात करतो. परिणामी, इराण युद्धामुळे पश्चिम आशियात निर्माण झालेल्या अशांततेचा भारतावरही परिणाम होत आहे. यासोबतच पर्यायी ऊर्जा स्रोत आणि होर्मुझचा गांभीर्याने शोध घेतला जात आहे. आखाती प्रदेशातून गॅसचा अखंड पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी भारत सरकार ओमानमधून थेट खोल समुद्रात गॅस पाइपलाइन बांधणीची योजना वेगाने पुढे नेट असून होर्मुझ सामुद्रधुनीतील संकटानंतर केंद्र सरकार ऊर्जा सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देऊन महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवत आहे.

# बाणेरमध्ये महापालिकेचे कर्करोग रुग्णालय!

## कॅन्सर रुग्णांसाठी एकाच छताखाली सर्व सुविधा; रुग्णालयाचे रविवारी उद्घाटन

**महाईन्यूज । पुणे**

**गेल्या काही वर्षांमध्ये कर्करोगाच्या रुग्णांची वाढत असलेली संख्या आणि त्यावर उपचारांसाठी होणारा खर्च पाहता. कर्करोगाच्या रुग्णांना आणि त्यांच्या कुटूंबाला दिलासा देण्यासाठी महापालिकेने आपुलकी मेडिकल केअर सेंटर यांच्या वतीने रुग्णालय सुरू केले असून, या रुग्णालयाचे लोकार्पण उद्या (रविवारी) १७ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. 'सार्वजनिक खासगी भागीदारी' (पीपीपी) पद्धतीने हे रुग्णालय उभारण्यात आले आहे.**




स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी ही माहिती दिली. सुमारे १५० खाटांचे हे रुग्णालय असून यामध्ये विविध प्रकारच्या कर्करोगांवर उपचार केले जाणार आहेत. तसेच हृदयविकारांवर उपचार होणार आहेत. शासकिय दरात येथे उपचार मिळणार असून यामुळे शहरातील कर्करोगाच्या रुग्णांना दिलासा मिळणार आहे.

बाणेर परिसरात महापालिकेची एक एकर जागा होती. या जागेवर हे रुग्णालय उभारण्यात आले आहे. हा सुमारे १६५ कोटी रुपयांचा प्रकल्प असून, महापालिकेने १४ कोटी रुपयांची जमीन अद्यावत रुग्णालय उभारण्यासाठी उपलब्ध करुन दिली आहे. उर्वरित संपूर्ण खर्च संबधित संस्थेच्या वतीने करण्यात आला आहे. या अद्यावत रुग्णालयासाठी आवश्यक असलेली गुंतवणूक, व्यवस्थापन तसेच कर्मचारी यांच्या खर्चाची जबाबदारी आपुलकी मेडिकल केअर सेंटर पार पाडणार आहे. पीपीपी तत्त्वावर उभारलेले असे हे देशातील पहिलेच कर्करोग रुग्णालय आहे.

या रुग्णालयामध्ये उपचार घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांकडून शासकीय दराने (सीजीएचएस) शुल्क घेतले जाणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना कर्करोगाचे उपचार घेणे सोपे होणार आहे. कर्करोगाच्या निदानापासून उपचार तसेच शस्त्रक्रिया अशी सुविधा येथे मिळणार आहे. आवश्यक त्या सेवा सुविधा एका छताखाली मिळणार असल्याचे भिमाले यांनी सांगितले. यावेळी स्थानिक नगरसेविका मयुरी कोकाटे, महापालिकेच्या आरोग्य प्रमुख डॉ. नीना बोऱ्हाडे, उपआरोग्य प्रमुख डॉ. संजीव वावरे यांच्यासह महापालिकेच्या आरोग्य विभागातील अधिकारी उपस्थित होते.

### रुग्णालयात ३५ कोटींची मशीन

सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी महापालिकेने पीपीपी तत्त्वावर उभारण्यात आलेल्या या रुग्णालयामध्ये कर्करोगाच्या पेशींवर अचूक उपचार करण्यासाठी अत्याधुनिक 'लिनियर ॲक्सेलेरेटर' मशीन बसविण्यात आले आहे. ३५ कोटी रुपये किमतीची ही मशीन पुण्यातील केवळ काही मोजक्या रुग्णालयांमध्ये उपलब्ध आहे. याबरोबरच पेट स्कॅन, मॅमोग्राफी, बायोप्सी, अत्याधुनिक शस्त्रक्रिया थिएटर आणि जनरल हॉस्पिटल अशा सुविधाही येथे उपलब्ध असतील.

# 'नीट' पेपरफुटी प्रकरणात महिला प्राध्यापक अटकेत; सीबीआयकडून कारवाई

**महाईन्यूज । पुणे**

**देशभरात गाजत असलेल्या 'नीट' प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणात पुण्यातील जीवशास्त्राच्या प्राध्यापक मनीषा गुरुनाथ मांढरे हिला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) पुण्यातून अटक केली. मांढरे ही परीक्षा प्रक्रियेशी (एनटीए) संबंधित आहे. पेपरफुटी प्रकरणात ती सामील असल्याचे उघडकीस आल्यानंतर तिला अटक करण्यात आली, अशी माहिती सीबीआयने दिली.**



मनीषा मांढरे ही वरिष्ठ प्राध्यापिका आहे. ती परीक्षा प्रक्रियेशी संबंधित आहे. या प्रकरणात तिची दिल्लीत चौकशी करण्यात आली. त्यानंतर तिला अटक करण्यात आली. परीक्षा प्रक्रियेशी संबंधित असल्याने तिचा वनस्पतीशास्त्र, तसेच प्राणीशास्त्र या विषयाच्या प्रश्नपत्रिकांशी संबंध होता. या प्रकरणात बिबवेवाडीतील ब्युटीपार्लरचालक महिला मनीषा वाघमारे हिला अटक करण्यात आली होती. वाघमारेने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तिच्या घरी बोलविले होते. तेथे प्रा. मांढरेने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांना प्रश्न, अचूक उत्तरांची माहिती तिने दिली होती. ही बाब तपासात उघडकीस आल्यानंतर प्रा. मांढरेला अटक करण्यात आली, अशी माहिती सीबीआयकडून देण्ात आली.

'नीट' प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार प्रा. पी. व्ही. कुलकर्णी याला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) पुण्यातून शुक्रवारी अटक केली. कुलकर्णी हा रसायनशास्त्राचा प्राध्यापक आहे. कुलकर्णी हा परीक्षा प्रक्रियेशी संबंधित होता. पेपरफुटी प्रकरणात तो सामील असल्याचे उघडकीस आल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. कुलकर्णीची सीबीआयच्या पथकाने चौकशी केली. चौकशीत मांढरे ही या प्रकरणात सामील असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर तिला सीबीआयने अटक केली.

'नीट' प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणात सीबीआयने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथून धनंजय लोखंडे (वय २६) याला ताब्यात घेतले. लोखंडे हा पुण्यातील काही जणांच्या संपर्कात असल्याची माहिती तपासात मिळाली. त्यानंतर बिबवेवाडी परिसरात ब्यूटी पार्लर चालविणारी मनीषा वाघमारे आणि अभियांत्रिकी शाखेत शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्याला पुणे पोलिसांनी बुधवारी (१३ मे) ताब्यात घेतले. धनंजय लोखंडे आणि मनीषा वाघमारे हिला अटक केली. या प्रकरणात जयपूरमधील तीन, गुरुग्राममधील एक आणि नाशिकमधील एका आरोपीचा समावेश आहे.

सीबीआयने देशातील वेगवेगळ्या भागांत छापे टाकले. कागदपत्रे, मोबाइल संच, तसेच अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त करण्यात आली होती. जयपूर, ग्रुरुग्राम, नाशिकि, पुणे, अहिल्यानगर परिसरातून आतापर्यंत नऊ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणातील पाच आरोपींना सात दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहे. पुण्यातून प्रा. पी. व्ही. कुलकर्णी, मनीषा वाघमारे यांना अटक करण्यात आली आहे. त्यांना पुण्यातील विशेष न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

### मार्गदर्शन वर्गात शिकवलेले प्रश्न 'नीट' परीक्षेत

प्रा. मनीषा मांढरेला दिल्लीत अटक करण्यात आली. 'नीट' परीक्षेच्या प्रश्नपत्रिका तयार करण्याच्या प्रक्रियेत ती सहभागी झाली होती. ब्युटीपार्लरचालक मनीषा वाघमारेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एकत्र करुन त्यांना विशेष मार्गदर्शन केले. मार्गदर्शन वर्गात शिकविण्यात आलेले प्रश्न नीटच्या प्रश्नपत्रिकेत आले होते, असे सीबीआयने स्पष्ट केले आहे.

# एजे फर्निचर मॉलवर बिश्नोई गँगच्या शुटर्सचा गोळीबार

## शुभम लोणकरची फेसबुक पोस्ट, व्यावसायिकाला फायनल वॉर्निंगच देऊन टाकली

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवडमध्ये शुक्रवारी रात्री घडलेल्या गोळीबाराच्या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. कोयता गँगच्या वाढत्या दहशतीनंतर आता लॉरेन्स बिश्नोई गँगचे नाव समोर आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पिंपरी-चिंचवडच्या रावेत येथील प्रसिद्ध 'एजे फर्निचर मॉल'वर दोन अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केल्याची घटना रात्री साडेनऊच्या सुमारास घडली. या प्रकारानंतर पोलिस यंत्रणा तातडीने सक्रिय झाली असून शहरातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी मॉलसमोर येत थेट गोळीबार सुरू केला. त्यांच्या हातात दोन पिस्तुलं होती आणि त्यांनी मॉलच्या दिशेने पाच ते सहा राऊंड फायर केले. गोळ्या मॉलच्या नेमप्लेट आणि काचेवर लागल्याने मोठे नुकसान झाले. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. गोळीबार केल्यानंतर आरोपी काही क्षणांत घटनास्थळावरून पसार झाले. घटनेची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी, गुन्हे शाखेचे पथक आणि फॉरेन्सिक टीम घटनास्थळी दाखल झाली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेत तपास सुरू केला आहे.

या प्रकरणाला आणखी गंभीर वळण तेव्हा मिळाले, जेव्हा लॉरेन्स बिश्नोई गँगशी संबंधित असल्याचा दावा करणाऱ्या शुभम लोणकरने सोशल मीडियावर पोस्ट करत या गोळीबाराची जबाबदारी स्वीकारली. या पोस्टमध्ये एजे फर्निचर मॉलचे मालक अशोक नैन यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. तसेच हा फक्त ट्रेलर आहे, पुढची गोळी थेट डोक्यात असेल, असा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे व्यावसायिकांना लक्ष्य करून टोळ्यांकडून दबाव टाकला जात असल्याची चर्चा रंगली आहे. पोलिसांकडून या सोशल मीडिया पोस्टची सत्यता आणि त्यामागील व्यक्तींची पडताळणी केली जात आहे.

या हल्ल्यानंतर पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तयार केली असून शहरातील विविध भागांमध्ये तपास सुरू करण्यात आला आहे. पोलिस उपायुक्त गणेश इंगवले यांनी सांगितले की, घटनास्थळावरून महत्त्वाचे फॉरेन्सिक पुरावे गोळा करण्यात आले आहेत. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. या घटनेमुळे शहरातील व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नावरून प्रशासनावरही दबाव वाढताना दिसत आहे.

### बिष्णोईने स्वीकारली जबाबदारी

पिंपरी चिंचवडमध्ये AJ फर्निचर वर केलेल्या गोळीबाराची जबाबदारी लॉरेन्स बिष्णोई गँगने स्वीकारली आहे. या अनुषंगाने लॉरेन्स बिष्णोईचा भाऊ आरजू बिष्णोई याच्या नावाने एक ऑडिओ समोर आलाय. जो आमच्या विरोधात आहे, त्याची आणि आमची लवकरचं भेट होईल. असा इशारा ही या ऑडिओद्वारे देण्यात आलाय. हा ऑडिओ खरंच लॉरेन्स बिष्णोई गँगशी संबंधित आहे का? याची पुष्टी महाईन्यूज करत नाही.

# हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो पुन्हा विलंबाच्या भोवऱ्यात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणेकरांसाठी विशेषतः आयटी क्षेत्रातील लाखो नोकरदारांसाठी महत्त्वाचा ठरणारा हिंजवडी ते शिवाजीनगर पुणे मेट्रो मार्ग 3 प्रकल्प पुन्हा एकदा विलंबाच्या भोवऱ्यात अडकण्याची चिन्हे दिसत आहेत. प्रशासनाकडून 15 जूनपासून प्रवासीसेवा सुरू करण्याचे संकेत दिले जात असले, तरी प्रत्यक्ष कामाची स्थिती पाहता हा मुहूर्त पुन्हा हुकण्याची शक्यता व्यक्त होत आहे.**



त्यामुळे आयटी कॉरिडॉरमधील प्रवाशांमध्ये नाराजी वाढत आहे. 8,313 कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची अंमलबजावणी पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड (पीआयटीसीएमआरएल) मार्फत केली जात आहे. प्रकल्पाच्या आर्थिक प्रगतीचा वेग मोठा असला, तरी भौतिक कामे अद्याप पूर्णत्वास गेलेली नाहीत.

उपलब्ध आकडेवारीनुसार, मे अखेरपर्यंत प्रकल्पाच्या एकूण खर्चापैकी तब्बल 97.40 टक्के निधी खर्च झाला आहे. मात्र, प्रत्यक्ष कामाची प्रगती 94.58 टक्क्यांवर पोहोचली आहे. त्यामुळे निधी खर्च आणि कामाची गती यामध्ये तफावत असल्याचे स्पष्ट होत आहे.

### 2027 पर्यंत प्रकल्प लांबण्याची शक्यता

23.203 किमी लांबीच्या या मेट्रो मार्गिकेचे पूर्ण काम ऑक्टोबर 2026 पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. मात्र, सध्याची मंद गती आणि अपूर्ण कामे पाहता प्रकल्प 2027 पर्यंत लांबण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी, वाहतूक कोंडीमुळे त्रस्त असलेल्या पुणेकरांना अजून काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे.

### पहिल्या टप्प्यातील स्थानके अजूनही प्रतीक्षेत

पहिल्या टप्प्यात हिंजवडीकडील 12 स्थानके सुरू करण्याचे नियोजन होते. यामध्ये मेगापोलिस सोसायटी, क्वाड्रॉन बिझनेस पार्क, इन्फोसिस फेज-2, विप्रो, वाकड चौक आणि बालेवाडी स्टेडियम यांसारख्या महत्त्वाच्या स्थानकांचा समावेश आहे. मात्र, अनेक ठिकाणी अंतिम चाचण्या आणि सुविधा पूर्ण न झाल्याने हा विलंब आणखी वाढणार आहे.



## भूमिका

# महागाईच्या झळा



**केंद्र सरकारने पेट्रोल व डिझेलच्या दरात प्रति लिटर 3 रुपयांची वाढ केल्याने सर्वच क्षेत्रांवर त्याचा मोठा परिणाम होण्याची चिन्हे आहेत. खरे तर युद्धजन्य स्थिती, बदलती समीकरणे व इंधन तुटवडा यामुळे ही दरवाढ अपेक्षितच होती. परंतु, पाच राज्यांतील निवडणुकांमुळे ती लांबवण्यात आली.**

हे बघता महागाई व आर्थिक संकट हे देशापुढचे आव्हान असेल. अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याइतकीच पेट्रोल-डिझेल ही आजची महत्त्वाची गरज होय. मुळात कुठल्याही गरजा भागवायच्या, तरी इंधन लागतेच, इतकी ती मूलभूत बाब. मागच्या जवळपास चार वर्षात तेल कंपन्यांनी पेट्रोल व डिझेलच्या किमती वाढवलेल्या नाहीत. परंतु, जगातील युद्धस्थितीच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल 70 डॉलरवरून 110 ते 115 डॉलरपर्यंत पोहोचले. स्वाभाविकच तेल कंपन्यांना दररोज जवळपास 1000 ते 1200 कोटींहून अधिकची झळ सोसावी लागत होती. हे बघता इंधन दरवाढ अटळ मानली जात होती.

केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूमंत्री हार्दिक सिंग पुरी यांनीही दोन दिवसांपूर्वी अप्रत्यक्षपणे दरवाढीचे संकेत दिले होते. त्यानंतर सरकारने हा निर्णय घेतला असला, तरी प्रत्यक्षात तो काही दिवस आधीच व्हायचा. तथापि, पाच राज्यांतील निवडणुकांवर डोळा असल्याने निर्णय घेण्याबाबत विलंब झाला. वास्तविक, मागच्या काही दिवसांपासून सरकारकडून याबाबतची वातावरणनिर्मिती सुरू होती. मोदी यांनी इंधन काटकसरीचे केलेले आवाहन हा त्याचाच भाग. भारत आपल्या एकूण गरजेपैकी मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल परदेशातून आयात करतो. परंतु, अमेरिका, इराण युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनी ठप्प झाली. तेथून भारतात 20 टक्के तेल वाहतूक होत असल्याने भारतासमोर मोठ्या अडचणी निर्माण झाल्या. दुसऱ्या बाजूला ट्रम्प यांनी घातलेला बिब्बा व परराष्ट्रनीतीतील काही त्रुटींमुळे रशियासोबतच्या पूर्वापार संबंधातही काहीसा अडसर आला.

स्वाभाविकच इंधन तुटवडासदृश स्थिती निर्माण झाली. सध्या देशाकडे 60 दिवस पुरेल इतका साठा असल्याचे सांगण्यात येते. म्हणजे सध्यातरी काही अडचण नाही. मात्र, देशाचे इंधनावरील पराकोटीचे अवलंबित्व लक्षात घेता भारतासारख्या देशाकरिता पुढचा टप्पा कसोटीचा असू शकतो. सध्या तीन रुपयांनी पेट्रोल व डिझेलच्या दरात वाढ झाली असली, तरी इंधन कोंडी व कच्च्या तेलाचे वाढते दर ध्यानात घेता नजिकच्या काळात त्यातही वृद्धी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकीकडे रुपयाचे अवमूल्यन, परकीय चलनात घट यांसारख्या संकटांना देश सामोरा जात आहे. त्यात इंधन दरवाढीमुळे महागाईच्या झळा अतितीव्र होऊ शकतात. भारतातील मालवाहतूक प्रामुख्याने डिझेलवर चालते. त्याचा थेट परिणाम बाजारातील वस्तूंच्या किमतीवर होऊ शकतात.

याशिवाय बस प्रवास, रिक्षा-टॅक्सी भाडे, खासगी वाहतूक सेवा यांचे दर वाढण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर भाजीपाला, अन्नधान्य, दूध, फळे यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंनाही महागाईचा तडका मिळण्याची चिन्हे आहेत. शेतमाल आणि वाहतूक हे समीकरणच. इंधन दरवाढीमुळे शेतमाल बाजारात पोहोचवण्यासाठी वाहतुकीकरिता अधिकचा खर्च मोजावा लागेल व त्याचा अतिरिक्त भार ग्राहकांवर टाकला जाईल, हेही गृहित धरावे लागेल. मुळात शेतपंप, ट्रॅक्टर, जनरेटर यासाठी लागणारे इंधन महागल्यास शेतीचा उत्पादन खर्च वाढेल. त्यामुळे कृषी क्षेत्रावरही याचा विपरीत परिणाम होणार आहे.

इंधन दरवाढीचा उद्योग क्षेत्रालाही फटका बसणार असून, उत्पादन खर्च वाढल्याने कंपन्यांकडून पुढच्या काही दिवसांत वस्तूंच्या किमती वाढवल्या जाऊ शकतात. त्यामुळे महागाईचा मोठा भडका उडणार, यात संदेह नाही. हे पाहता सर्वसामान्य घटक, मध्यमवर्गीयांसह सर्वांचेच आर्थिक बजेट कोलमडण्याची भीती आहे. एकूणच हा टप्पा आर्थिक संकटाची चाहूल देणारा म्हणता येईल. डॉ. मनमोहनसिंग यांनी 1991 व 2008 च्या आर्थिक संकटांमध्ये आपल्या अर्थनीतीतून देशाला तारून नेले. त्याच धीरोदात्तपणे व शांतपणे नेतृत्वाला देशाला पुढे जावे लागेल.

## प्रासंगिक »

### वेळेचे महत्त्व

**एक स्वार आपल्या घोड्याला खरारा करून त्याच्यावर खोगीर घालत असता घोड्याच्या एका पायाच्या नालाचा एक खिळा सुटून पडला आहे असे त्याला दिसले.**

पण तेथे दुसरा खिळा बसविण्याचे काम त्याने मागे टाकले. काही वेळाने लढाईवर जाण्याचे इशारे देण्याचे शिंग वाजू लागताच तो स्वार आपल्या घोड्यावर बसून लढाईच्या जागेकडे निघाला. त्या फौजेच्या सेनापतीने हुकूम सोडला की, 'सर्वांनी आपले घोडे भरधाव सोडून शत्रूंवर तुटून पडावे व त्यांचा पाठलाग करावा.' हुकमाप्रमाणे तो स्वार आपला घोडा उडवीत चालला असता खिळा पडल्यामुळे सैल झालेला घोड्याचा नाल गळून पडला व त्यामुळे घोडा लंगडत लंगडत चालू लागला. लंगडताना एका दगडावर त्याचा पाय आपटल्यामुळे स्वार घोड्यावरून खाली पडला व तो शत्रूच्या हाती सापडताच शत्रूने लगेचच त्याला मारले.

- तात्पर्य :

जेव्हाचं काम तेव्हा न करता ते आळसाने पुढे ढकलणे ही सवय वाईट व घातक आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत संघर्ष पुन्हा एकदा उघडपणे समोर आला असून, शरद पवार यांच्या अलीकडील पत्रकार परिषदेनंतर राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

# राष्ट्रवादीतील संघर्ष आणि शरद पवारांचे असेसमेंट!

अजित पवारांच्या बंडानंतर काही काळ शांत दिसणारे शरद पवार आता पुन्हा संघटनात्मक पुनर्बांधणीच्या तयारीत असल्याचे स्पष्ट संकेत दिसत आहेत. निवडणूक आयोगाने सुनेत्रा पवार यांच्या पत्राला मान्यता दिल्यानंतर प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांना राष्ट्रीय कार्यकारिणीत स्थान न देण्यात आल्याने अजित पवार गटातील अंतर्गत अस्वस्थता उघड झाली. या पार्श्वभूमीवर तटकरे यांनी शरद पवारांची भेट घेतली. मात्र, पवारांनी "ते आता वेगळ्या पक्षात आहेत" असे सांगत अलिप्त भूमिका घेतली, तर दुसरीकडे "त्यांना मोठ्या जबाबदाऱ्या आम्हीच दिल्या होत्या" असे म्हणत त्यांच्या राजकीय उंचीची जाणीवही करून दिली. या एका विधानातून पवारांनी नाराजी, अनुभव आणि राजकीय इशारा तिन्ही गोष्टी स्पष्ट केल्या.

या संघर्षात नव्या पिढीचे नेतृत्वही पुढे येताना दिसत आहे. रोहित पवार यांनी तटकरे आणि पटेल भाजप किंवा शिंदे गटात जाऊ शकतात,



असा सूचक आरोप करत पक्षातील अविश्वास अधोरेखित केला. विशेष म्हणजे या आरोपांचे ठोस खंडन संबंधित नेत्यांनी केले नाही. त्यामुळे अजित पवार गटातील अंतर्गत तणाव आणि नेतृत्वातील असुरक्षितता अधिक स्पष्ट झाली आहे.

शरद पवार यांनी मात्र कुठेही उघड आक्रमकता दाखवली नाही. त्यांनी अत्यंत संयमी आणि मोजक्या शब्दांत राजकीय संदेश दिले. बारामतीच्या राजकारणाचा उल्लेख करताना "जनता कामावर स्वीकार ठरवते" असे सांगून त्यांनी अप्रत्यक्ष टोलेबाजी केली. त्याचवेळी रोहित पवार, पार्थ पवार आणि जय पवार या नव्या चेहऱ्यांना पुढे आणण्याचे संकेत दिले. यावरून राष्ट्रवादीत नव्या नेतृत्वाची पेरणी सुरू झाल्याचे दिसते.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनावर प्रतिक्रिया देताना पवारांनी संतुलित भूमिका घेतली. खर्च नियंत्रणाचे समर्थन करतानाच त्यांनी सर्वपक्षीय बैठकीची गरज मांडली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राहुल गांधींबाबतच्या वक्तव्यावर "राजकीय संस्कृती जपली पाहिजे" असे म्हणत त्यांनी सभ्य राजकारणाचा मुद्दा पुढे केला.

एकूणच, शरद पवार सध्या थेट संघर्ष टाळत असले तरी संघटनात्मक पुनर्बांधणी आणि राजकीय पुनर्स्थापनेच्या दिशेने सक्रिय झाले आहेत. त्यांनी कुणालाही माफ केलेले नाही, पण उघड युद्धही पुकारलेले नाही. मात्र त्यांच्या प्रत्येक वक्तव्यातून अजित पवार गटाला स्पष्ट राजकीय इशारा दिला जात असल्याचे दिसून येते.

## ।। अभंगवाणी ।।



सांगतों तें तुम्हीं अइकावें कानीं ।
आमुचे नाचणीं नाचूं नका ॥१॥

जोंवरी या तुम्हां मागिलांची आस ।
तोंवरी उदास होऊं नका ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महसूल विभागातील सुनावण्यांबाबत मोठा निर्णय!

## निर्धारित वेळेत निकालासाठी नवी कार्यपध्दती, आता मराठीत निकाल बंधनकारक

महाईन्यूज । मुंबई

**राज्यभरातील महसूल अधिकारी आणि प्राधिकरणांकडे दाखल होणारी अर्धन्यायीक प्रकरणे आता अधिक वेगाने निकाली काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नवीन 'मानक कार्यपध्दती' (एसओपी) निश्चित करून तिची अंमलबजावणी आजपासून लागू केली आहे.**



या संदर्भातील शासन आदेश आज काढण्यात आला असून, यापुढे महसूल विभागातील सर्व अर्धन्यायिक कामकाजात मराठी भाषेचा वापर तसेच निकालपत्रे मराठी भाषेतून बंधनकारक करण्यात आले आहेत.

शासन तसेच महसूल अधिकारी, प्राधिकाऱ्यांकडे दाखल होणारे अर्धन्यायिक प्रकरणे हाताळण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून, २९ पानांच्या शासन आदेशातून यापुढेची वाटचाल निश्चित आली आहे.

अर्धन्यायीक कामकाजामधील पीठासीन अधिकारी यांना त्यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या यांची जाणीव नसणे, नैसर्गिक न्यायतत्वांचे पालन न करणे, प्रकरणातील वस्तुस्थिती, तथ्ये व सांविधिक तरतुदींचा विचार न करता व यथायोग्य कार्यासक्ती न करता (without application of mind) स्वच्छंद निर्णय पारित करणे, अर्ज/अपील दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत पुरेसे कारण नसताना विलंब माफ करणे, संबंधित अधिनियमाचे सखोल ज्ञान नसणे, अर्धन्यायीक अर्ज/अपील दाखल करून घेताना त्याची छाननी न करणे, अधिकारिता नसताना निर्णय पारित करणे इत्यादी सारख्या अर्धन्यायीक कार्यपध्दतीविषयक गंभीर त्रुटी निर्दशनास आलेल्या असल्याने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही व्यवस्था सुधारण्यासाठी कार्यपद्धती लागू करून प्रभावी पाऊल उचलले आहे. नवीन कार्यपध्दतीनुसार आता सुनावणीची प्रक्रिया सुलभ करण्यात आली असून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य केला आहे.

सर्व महसूल अधिकाऱ्यांना आठवड्यातून किमान दोन वेळा (शक्यतो मंगळवार आणि शुक्रवार) सुनावणी घेणे बंधनकारक असेल. केवळ ठोस कारण असल्यास सुनावणी एकदाच तहकूब करता येईल.

सर्व प्रकारचे अंतरिम आणि अंतिम निर्णय 'e-QJ Court' प्रणालीवर नोंदवून डिजिटल स्वाक्षरीनेच दिले जातील.

दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय आणि योग्य कारणमीमांसा दिल्याशिवाय आदेश पारित करता येणार नाही.

सुनावणी पूर्ण झाल्यानंतर जास्तीत जास्त आठ आठवड्यांच्या आत सकारण आदेश पारित करणे आवश्यक आहे.

गौणखनिज प्रकरणे, शेतरस्ता उपलब्ध करून देणे, दरखास्त प्रकरणे, कलम १५५ अंतर्गत लेखनप्रमाद दुरुस्ती, तसेच महसूल संहितेतील विविध प्रकरणांच्या सुनावणीसंदर्भातही स्वतंत्र मार्गदर्शक तत्त्वे या शासन निर्णयात नमूद करण्यात आली आहेत. या निर्णयामुळे महसूल न्यायालयांमधील प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी होऊन सामान्य शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

> " मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख आणि गतिमान करण्याचा आमचा मानस आहे. महसूल अधिकाऱ्यांच्या अर्धन्यायीक कामकाजामध्ये सुधारणा करून गतीमान कार्यप्रणाली करून निकालांचा दर्जा सुधारण्यासाठी उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यापूर्वी विविध शासन निर्णयाव्दारे अर्धन्यायीक कामकाजाबाबत दिशा निर्देश देण्यात आलेले आहेत. या सर्व शासन निर्णयांचा, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय, क्षेत्रीय स्तरावरील सूचना व विभागीय आयुक्त, पुणे यांनी केलेल्या शिफारशी यांचा समतोल साधून, अर्धन्यायीक कामकाज व कार्यप्रणालीमध्ये सुधारणा करण्याचा शासनाचा उद्देश आहे.
>
> - चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री.

---

## 'सुनेत्रा पवार, पार्थ पवार यांच्याशी चर्चा करायची इच्छा नाही'; आमदार रोहित पवार

महाईन्यूज । मुंबई

**माजी उपमुख्यमंत्री, दिवंगत नेते अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील समीकरणे बदलली आहेत. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्या. तर त्यांचा मुलगा पार्थ पवार राज्यसभेचा खासदार झाला. तर दुसरा मुलगा जय पवार राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात सक्रिय झाला आहे. यावरून पक्षात धुसफूस असताना आता पवार कुटुंबातही नाराजी असल्याचे चित्र दिसत आहेत. आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत बोलताना पार्थ पवार आणि सुनेत्रा पवार यांच्याशी बोलायची इच्छा नसल्याचे विधान केले.**



अजित पवारांच्या अपघाती निधनानंतर याची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि सत्य बाहेर यावे, यासाठी रोहित पवार आक्रमक झालेले दिसले. त्यांनी आजवर अनेक पत्रकार परिषदा घेत त्यात सखोल मांडणी केली. तसेच लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह इंडिया आघाडीतील महत्त्वाच्या नेत्यांची भेट घेऊन या प्रकरणात दबाव वाढवण्याचा प्रयत्न केला.

काही दिवसांपूर्वी पार्थ पवार यांच्या कार्यालयाने प्रवासासाठी व्हीएसआर विमान बुक केले होते. तसेच आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या शपथविधीच्या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या बाजूला केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू किंजरापू बसले होते. व्हीएसआर कंपनीच्या मालकाशी त्यांचे संबंध असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला होता. या दोन घटनांनंतर आता रोहित पवार यांची ताजी प्रतिक्रिया समोर आली आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना रोहित पवार म्हणाले, "पार्थ पवारने जेव्हा व्हीएसआर विमानातून प्रवास केला. तसेच काही दिवसांपूर्वी केंद्रीय मंत्री राम मोहन नायडू यांच्याबरोबर काकींचा (सुनेत्रा पवार यांचा) फोटो पाहिला, त्यानंतर मी कोणाशीही चर्चा केली नाही. तसेच कोणाशीही चर्चा करण्याची इच्छा नाही. आम्ही न्यायालयात आणि लोकांपर्यंत जाऊन प्रामाणिकपणे लढत आहेत. हे सर्व पाहत असताना आम्ही लढावे की नाही? असा प्रश्न दुर्दैवाने आमच्यासमोर निर्माण होतो."

खासदार सुनील तटकरे यांनी काही दिवसांपूर्वी यांनी शरद पवार यांची भेट घेतली होती. यावरही रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत भाष्य केले. सुनील तटकरे यांच्यासह प्रफुल पटेल यांनीही शरद पवारांची भेट घेतली असावी, अशी शक्यता रोहित पवारांनी व्यक्त केली. दरम्यान, या बैठकीत केवळ प्रकृतीविषयी चर्चा झाल्याचे दोन्ही बाजूंनी सांगण्यात येत असल्याने, त्यात तथ्य असावे असेही ते पुढे म्हणाले.

### तर सुनेत्रा पवारांचा मी सत्कार करेन

अजित पवारांच्या अपघाताच्या प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सोपवावी, अशी मागणी रोहित पवार सातत्याने करत आले आहेत. २८ मे पूर्वी जर अजित पवारांच्या अपघाताचे प्रकरण सीबीआयकडे सुपूर्द केले तर मी स्वतः उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा सत्कार करेन, असे रोहित पवार म्हणाले.

# भारतात पहिल्यांदाच सापडले ‘जिहादी ड्रग’!

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची ‘X’ (ट्विटर) वर पोस्ट करत माहिती

**महाईन्यूज ।**
नवी दिल्ली

**देशाला ड्रग्जमुक्त करण्यासाठी केंद्र सरकारने अमली पदार्थ माफियांविरोधात मोठी मोहीम सुरु केली आहे. अमली पदार्थ नियंत्रण ब्युरोने (NCB) ‘ऑपरेशन रेजपिल’ अंतर्गत आंतरराष्ट्रीय ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत भारतात पहिल्यांदाच तब्बल १८२ कोटी रुपयांचे ‘कॅप्टागॉन’ (CAPTAGON) हे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. या ड्रग्जला जगभरात ‘जिहादी ड्रग’ म्हणून ओळखले जाते.**



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ‘X’ (ट्विटर) वर पोस्ट करत या कारवाईची माहिती दिली आहे. माहितीनुसार, जप्त करण्यात आलेला ड्रग्जचा हा मोठा साठा मध्य पूर्वेतील देशांमध्ये पाठवला जाणार होता. मात्र, भारतीय यंत्रणांनी सतर्कता दाखवत हा डाव हाणून पाडला. याप्रकरणी एका विदेशी नागरिकाला अटक करण्यात आली असून त्याची चौकशी सुरू आहे.

गृहमंत्री अमित शाह यांनी एनसीबीच्या कामगिरीचे कौतुक करताना म्हटले की,"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार भारताला ड्रग्जमुक्त करण्यासाठी कटिबद्ध आहे. भारताच्या भूमीचा वापर करून होणारी ड्रग्जची आंतरराष्ट्रीय तस्करी रोखण्यासाठी एनसीबी कटिबद्ध असून, देशात येणाऱ्या किंवा इथून बाहेर जाणाऱ्या ड्रग्जच्या प्रत्येक ग्रॅमवर आमची नजर असेल.”

सध्या बाजारात मिळणाऱ्या कॅप्टागॉन गोळ्या या बेकायदेशीरपणे आणि छुप्या प्रयोगशाळांमध्ये तयार केल्या जातात. अनेकदा यात मूळ ‘फेनेटिलाइन’ ऐवजी कॅफिन आणि ॲम्फेटामाइन यांसारख्या इतर घातक रसायनांचा वापर केला जातो. हे ड्रग्ज अत्यंत व्यसनधिन करणारे असून, युद्धग्रस्त आणि अशांत भागातील दहशतवादी संघटनांना पैसा पुरवण्याचा हा एक मोठा स्रोत बनला आहे.

भारतात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात कॅप्टागॉन जप्त झाल्याने सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्या असून, या रॅकेटची पाळेमुळे शोधण्याचे मोठे आव्हान आता एनसीबीसमोर असणार आहे.

### ‘जिहादी ड्रग’नक्की काय आहे?

‘कॅप्टागॉन’ हे मूळचे ‘फेनेटिलाइन’ या सिंथेटिक उत्तेजकाचे ब्रँड नाव आहे. १९६० च्या दशकात एकाग्रतेचा अभाव , नैराश्य आणि अतिझोप येणे यांसारख्या आजारांवरील उपचारांसाठी हे औषध विकसित करण्यात आले होते. मात्र, या औषधामुळे अंमली पदार्थांचे व्यसन जडत असल्याचे समोर आल्यानंतर, १९८० च्या दशकात यावर आंतरराष्ट्रीय स्तरावर बंदी घालण्यात आली. संयुक्त राष्ट्राने (UN) याला प्रतिबंधित अमली पदार्थांच्या यादीत टाकले आहे.

### ‘जिहादी ड्रग’ हे नाव कसे पडले?

पश्चिम आशियातील देशांमध्ये, विशेषतः सीरियातील यादवी युद्धादरम्यान या ड्रग्जचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर झाला. ‘इसिस’ (ISIS) सारख्या दहशतवादी संघटनांमधील दहशतवादी भीती दूर करण्यासाठी, अंगातील ताकद आणि ऊर्जा वाढवण्यासाठी तसेच सलग अनेक तास जागे राहण्यासाठी या गोळ्यांचे सेवन करायचे. दहशतवाद्यांकडून याचा मोठ्या प्रमाणावर वापर झाल्यामुळेच याला जगभरात ‘जिहादी ड्रग’ असे नाव पडले.

---

# नेपाळ सरकारला कोर्टाचा झटका! भारतीय वस्तूंवर कर लावण्याच्या आदेशाला स्थगिती

**महाईन्यूज । नेपाळ**

**भारताच्या सीमाभागातून नेपाळमध्ये येणाऱ्या स्वस्त वस्तूंच्या आयातीवर सीमाशुल्क आकारण्याच्या बालेन शाह सरकारच्या वादग्रस्त धोरणाला नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली आहे. नेपाळ-भारत सीमेवरून आणल्या जाणाऱ्या १०० नेपाळी रुपयांपेक्षा (NPR 100) जास्त किमतीच्या जीवनावश्यक वस्तूंवरही शुल्क वसूल करण्याची मुभा या नियमामुळे अधिकाऱ्यांना मिळाली होती. या नियमावर सीमावर्ती भागातील नागरिकांनी आणि ग्राहकांनी तीव्र आक्षेप घेतला होता. परिणामी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती हरी प्रसाद फुयाल आणि टेक प्रसाद ढुंगाना यांच्या संयुक्त खंडपीठाने शुक्रवारी हा अंतरिम आदेश जारी करत पुढील आदेशापर्यंत या धोरणाला स्थगिती दिली आहे.**



### सरकारच्या धोरणामुळे नेपाळ-भारत सीमेवर संताप

बालेन शाह यांच्या नेतृत्वाखालील सरकारने १०० रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या वस्तूंवर सीमाशुल्क अनिवार्य केल्यानंतर हा वाद सुरू झाला. या निर्णयामुळे नेपाळ-भारत सीमेवरील अनेक तपासनाक्यांवर गोंधळ आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाने आपल्या अंतरिम आदेशात पंतप्रधान कार्यालय, मंत्रिमंडळ, वित्त मंत्रालय आणि इतर संबंधित यंत्रणांना या वादग्रस्त नियमाची अंमलबजावणी अंतिम निकाल येईपर्यंत थांबवण्याचे निर्देश दिले आहेत. वित्त मंत्रालयाच्या या निर्णयाला आव्हान देणारी एक रिट याचिका दाखल झाल्यानंतर न्यायालयाने ही कारवाई केली. याचिकाकर्त्यांनी युक्तिवाद केला की, १०० रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या वस्तूंवर सीमाशुल्क आकारणे हे ‘सीमाशुल्क कायदा २०२४’ च्या तरतुदींचे उल्लंघन करणारे आणि बेकायदेशीर आहे. दोन्ही बाजूंच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने या नियमाला तात्पुरती स्थगिती देण्याचा निर्णय घेतला. तसेच अंतिम निकाल लागेपर्यंत पूर्वीचीच व्यवस्था लागू ठेवण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.



सीमेजवळ राहणारे अनेक नेपाळी नागरिक स्वस्त दरात जीवनावश्यक आणि घरगुती वस्तू खरेदी करण्यासाठी वारंवार भारतीय बाजारपेठांमध्ये जात असतात. मात्र, हा नियम लागू झाल्यानंतर सीमा अधिकाऱ्यांनी भारतातून परतणाऱ्या नागरिकांची तपासणी आणि चौकशी वाढवली होती.


अधिकारी चिप्सचे पाकीट, बिस्किटे, मसाले आणि इतर छोट्या किराणा वस्तूंवरही सीमाशुल्क वसूल करत असल्याचे समोर आले होते. या कडक अंमलबजावणीमुळे नेपाळच्या ‘तराई-मधेश’ भागात राहणाऱ्या लोकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत होता, कारण या भागातील कुटुंबांसाठी सीमापार खरेदी करणे ही एक सामान्य बाब आहे. या धोरणामुळे स्थानिक नागरिक आणि सीमा शुल्क अधिकाऱ्यांमध्ये अनेक तपासनाक्यांवर वाद आणि खटके उडाले होते. आता सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशामुळे, जोपर्यंत न्यायालय अंतिम निकाल देत नाही, तोपर्यंत सरकारला असे शुल्क वसूल करता येणार नाही.



# पिक्चरमध्ये 'अशी' झाली जान्हवीची 'एन्ट्री'

बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर (Janhvi Kapoor) हिंदीसोबतच दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतही आपली छाप पाडताना दिसत आहे. 'देवरा पार्ट १' नंतर आता ती राम चरणसोबत आगामी 'पेड्डी' चित्रपटात मुख्य भूमिकेत झळकणार आहे. या चित्रपटात ती 'अचियम्मा' ही महत्त्वाची भूमिका साकारत आहे. मात्र, या भूमिकेसाठी सुरुवातीला जान्हवी नव्हे तर तिची धाकटी बहीण खुशी कपूरची निवड करण्यात आली होती, असा खुलासा दिग्दर्शक बुची बाबू सना यांनी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत केला आहे. चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान दिलेल्या एका मुलाखतीत दिग्दर्शक बुची बाबू सना यांनी सांगितले की, त्यांनी सुरुवातीला खुशी कपूरला 'अचियम्मा'च्या भूमिकेसाठी कथा ऐकवली होती. मात्र, प्रत्यक्ष भेटीनंतर त्यांना खुशी या भूमिकेसाठी खूपच लहान वाटली. याबाबत बोलताना बुची म्हणाले, “मी आधी खुशी कपूरला कथा ऐकवली होती. पण तिला भेटल्यानंतर मला जाणवलं की ती या भूमिकेसाठी योग्य नाही. त्यानंतर मला त्याच घरात जाऊन जान्हवीला कथा सांगावी लागली. तो क्षण माझ्यासाठी खूप अवघड होता.” ते पुढे म्हणाले, “मी जान्हवीला स्पष्ट सांगितलं की खुशीला का नकार दिला. मी खुशीला भेटून 'हाय' म्हटलं आणि सांगितलं की मला या भूमिकेसाठी तिच्याऐवजी जान्हवी हवी आहे. सिनेमात कधी कधी अशा कठीण निर्णयांची गरज असते.” असेही त्यांनी बोलताना नमूद केलं. दिग्दर्शकाने हेही स्पष्ट केले की, सुरुवातीपासूनच त्यांच्या मनात या भूमिकेसाठी जान्हवीच फिट बसत होती. मी इतर कलाकारांना कथा सांगत असतानाही माझ्या डोळ्यासमोर 'अचियम्मा'च्या भूमिकेत जान्हवीच होती.

# लग्न करायचं असेल तर विचार करून करा



बॉलिवूड अभिनेत्री शेफाली शाह (Shefali Shah) हिने नुकत्याच एका मुलाखतीत लग्न, नातेसंबंध आणि मुलांबद्दल स्पष्ट मत मांडले आहे. तिच्या काही वक्तव्यांमुळे सोशल मीडियावर मोठी चर्चा रंगली आहे. विशेषतः “मुलं जन्माला घालण्यापेक्षा कुत्रे पाळा” आणि “घाईत लग्न करू नका” या तिच्या विधानांनी अनेकांचे लक्ष वेधले. लिली सिंह हिच्यासोबतच्या संवादात शेफाली शाहने तरुण मुलींना आयुष्यातील मोठे निर्णय विचारपूर्वक घेण्याचा सल्ला दिला. तिच्या मते, कमी वयात लग्नाचा निर्णय घेणे योग्य नाही. “लहान वयात लग्न करू नका. त्या वयात स्वतःलाच आपण नीट ओळखत नसतो. त्यामुळे आधी लोकांना समजून घ्या, स्वतःला ओळखा आणि मगच लग्नाचा विचार करा,” असे ती म्हणाली. तिने पुढे सांगितले की, लग्न ही फक्त एक रोमँटिक कल्पना नसून ती खूप जबाबदारीची गोष्ट आहे. “जर तुमचा लग्न या संस्थेवर विश्वास नसेल, तर कृपया लग्न करू नका. कारण नातं टिकवण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते,” असेही तिने स्पष्टपणे म्हटले. तिच्या मते, भावनिकदृष्ट्या परिपक्व झाल्यानंतरच लग्नासारखा मोठा निर्णय घ्यावा.

# आई झाल्यावर करिअरला ब्रेक?

टीव्ही इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेत्री रुबीना दिलैक हिने नुकतेच मनोरंजन विश्वातील एका महत्त्वाच्या विषयावर स्पष्टपणे मत मांडले आहे. आई झाल्यानंतर अनेक अभिनेत्रींच्या करिअरमध्ये अडथळे का येतात, याबद्दल बोलताना तिने इंडस्ट्रीतील जुन्या मानसिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तिच्या मते, आजही अनेक निर्माते आणि समाजातील काही लोक नव्या आईकडे “कमजोर” म्हणून पाहतात आणि त्यामुळे महिलांना मोठ्या संधींपासून दूर ठेवले जाते. रुबीना म्हणाली की, एखादी अभिनेत्री आई झाल्यानंतर तिच्यात आधीसारखी ऊर्जा, मेहनत करण्याची क्षमता किंवा कामाबद्दलची आवड उरत नाही, असा चुकीचा समज अनेकांच्या मनात असतो. त्यामुळे अनेक अभिनेत्रींच्या हातून चांगले प्रोजेक्ट्स निसटतात. काही निर्मात्यांना वाटते की, बाळाची जबाबदारी सांभाळताना अभिनेत्री शूटिंगला पुरेसा वेळ देऊ शकणार नाही. या विचारांमुळे महिलांना काम देताना संकोच केला जातो. तिने सांगितले की, अनेक अभ्यासांमध्ये असे दिसून आले आहे की जवळपास ६२ टक्के महिला गर्भधारणेनंतर पुन्हा आपल्या करिअरमध्ये पूर्वीसारख्या परतू शकत नाहीत. यामागे केवळ कौटुंबिक जबाबदाऱ्या नसून समाजाची मानसिकताही मोठ्या प्रमाणात कारणीभूत असते. महिलांना प्रत्येक टप्प्यावर जज केले जाते. करिअर, लग्न किंवा मातृत्व प्रत्येक निर्णयावर त्यांना प्रश्नांचा सामना करावा लागतो.



# नेटकऱ्यांना जान्हवीने दिलं उत्तर

अभिनेत्री जान्हवी किल्लेकरला 'बिग बॉस मराठी सीजन 5'मुळे मोठी लोकप्रियता मिळाली. सोशल मीडियावर तिचे फॅन फॉलोवर्स देखील मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सोशल मीडियावरही ती अनेक फोटो शेअर करते. नुकतेच जान्हवीने मुलासोबत काही फोटो सोशल मीडियावर पोस्ट केले. फोटोमध्ये जान्हवी आणि तिचा मुलगा स्विमिंग पूलमध्ये मज्जा मस्ती करताना दिसले. दोघांचे फोटो सोशल मीडियावर देखील तुफान व्हायरल झाले. पण काही नेटकऱ्यांनी दोघांचे फोटो खटकले. एका नेटकऱ्याने कमेंट करत जान्हवीला पतीवरून प्रश्न विचारला. 'मॅम तुम्ही तुमच्या मिस्टर सोबत कधीच फोटो पोस्ट का करत नाही?' असे विचारतच जान्हवीने सुद्धा मनमोकळेपणाने उत्तर दिले. तिने लिहिले की त्यांना नाही आवडत फोटो काढायला, कारण काही मूर्ख लोक त्याला ट्रॉल करायला मोकळे असतात.... म्हणून आम्ही फोटो काढणं अवॉइड करतो. जान्हवीच्या या कमेंट वर अनेकांनी तिला समर्थन दर्शवले आहे.



# रचिन रवींद्रनचे लक्ष कसोटीवर

## आयपीएलला ठोकला रामराम; केकेआरला धक्का

**महाईन्यूज I नवी दिल्ली**

**न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू रचिन रवींद्रने, इंग्लंडच्या आगामी कसोटी दौऱ्याच्या तयारीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी कोलकाता नाईट रायडर्सचा संघ सोडला आहे; ज्याचा परिणाम केकेआरच्या मोहिमेवर होणार आहे.**



रचिन रवींद्रने न्यूझीलंडच्या इंग्लंड दौऱ्यावरील कसोटी सामन्यांच्या तयारीसाठी कोलकाता नाईट रायडर्सचा संघ सोडला आहे.

आयपीएलच्या गुणतालिकेत सध्या केकेआर आठव्या स्थानावर आहे; त्यांनी चार सामने जिंकले आहेत, सहा गमावले आहेत आणि एका सामन्याचा निकाल लागलेला नाही.न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यासाठी इंग्लंडने तीन 'अनकॅप्ड' (आंतरराष्ट्रीय पदार्पण न केलेल्या) खेळाडूंची निवड केली आहे.

कोलकाता नाईट रायडर्सने शुक्रवारी या वृत्ताला दुजोरा दिली की, न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू रचिन रवींद्र इंग्लंडच्या आगामी कसोटी दौऱ्याच्या तयारीला सुरुवात करण्यासाठी आपल्या मायदेशी परतला आहे.

शनिवारी संध्याकाळी ईडन गार्डन्सवर, सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये असलेल्या गुजरात टायटन्सविरुद्ध होणाऱ्या कोलकाताच्या इंडियन प्रीमियर लीग 2026 सामन्यापूर्वी ही घडामोड समोर आली आहे. एका अधिकृत निवेदनात सांगितले की, न्यूझीलंडच्या राष्ट्रीय संघासोबतच्या 'रेड-बॉल' (कसोटी क्रिकेट) सामन्यांच्या जबाबदाऱ्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी रवींद्रने संघ सोडला आहे.

# प्लेऑफचे दोन संघ जवळपास निश्चित, तर २ स्थानांसाठी तीन संघांमध्ये चुरशीची लढत

**महाईन्यूज I मुंबई**

**आयपीएल २०२६ मध्ये प्लेऑफची लढत अधिक चुरशीची झाली आहे. प्लेऑफला जाणारे २ संघ जवळपास निश्चित झाले असून उर्वरित दोन जागांसाठी घमासान सुरू आहे. आयपीएल २०२६ च्या ५९ व्या सामन्यानंतर गुणतालिकेत मोठा बदल झाला आहे. हा सामना लखनौ येथील एकना स्टेडियमवर लखनौ सुपर जायंट्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्यात खेळला गेला. लखनौने हा सामना ७ गडी राखून जिंकून चेन्नईला मोठा धक्का दिला. त्यामुळे आता प्लेऑफच्या शर्यतीत मोठा बदल झाला आहे.**



चेन्नई सुपर किंग्सला या हंगामातील सहाव्या पराभवाला सामोरं जावं लागलं. सलग तीन सामने जिंकल्यामुळे त्यांनी प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या आशा बळकट केल्या होत्या. मात्र, या पराभवामुळे त्यांना मोठा धक्का बसला आहे.आता १२ सामन्यांमधून त्यांचे केवळ १२ गुण झाले असून, ते पाचव्या स्थानावरून सहाव्या स्थानावर घसरले आहेत. याचा तगडा फायदा राजस्थान रॉयल्सला झाला असून, तेही ११ सामन्यांमधून १२ गुणांसह सहाव्या स्थानावरून पाचव्या स्थानावर आले आहेत.

दुसरीकडे, लखनौ सुपर जायंट्सला या विजयाचा फायदा झालेला नाही. ते १० व्या स्थानावर कायम आहेत. १२ सामन्यांमधून त्यांचे आता ८ गुण झाले आहेत.मुंबई इंडियन्सचेही ८ गुण आहेत, पण नेट रन रेटमुळे मुंबई ९ व्या स्थानावर आहे. या दोन संघांव्यतिरिक्त, केकेआरनेही आतापर्यंत फक्त ४ सामने जिंकले आहेत, तर त्यांचा एक सामना पावसामुळे रद्द झाला होता, त्यामुळे ते ९ गुणांसह ८ व्या स्थानावर आहेत.

आता उर्वरित सामने सर्वच संघांसाठी 'करो या मरो'चे ठरणार आहेत. प्लेऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी प्रत्येक विजय महत्त्वाचा बनला आहे. चेन्नई सुपर किंग्ससमोर आता नेट रन रेट सुधारण्याचेही मोठे आव्हान उभे राहिले आहे. राजस्थान रॉयल्सने योग्य वेळी फॉर्म मिळवत गुणतालिकेत मोठी झेप घेतली आहे. लखनौ सुपर जायंट्स आणि मुंबई इंडियन्ससाठी पुढील सामने प्रतिष्ठेचे मानले जात आहेत. केकेआरलाही प्लेऑफच्या आशा कायम ठेवण्यासाठी सलग विजय मिळवावे लागणार आहेत. त्यामुळे आयपीएलच्या यंदाच्या हंगामात गुणतालिकेतील चुरस अधिकच रंगतदार झाली आहे. क्रिकेट चाहत्यांचे लक्ष आता आगामी सामन्यांकडे लागले असून, प्लेऑफच्या शर्यतीत कोण बाजी मारणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

## कोणत्या संघाचे प्लेऑफ गाठण्याची किती शक्यता

गुजरात टायटन्स व रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हे दोन्ही संघ १६ गुणांसह प्लेऑफच्या उंबरठ्यावर आहेत. यानंतर हैदराबादचा संघ १४ गुणांसह तिसऱ्या स्थानी असून त्यांची प्लेऑफ गाठण्याची शक्यता ७० टक्के आहे. तर सलग पाच पराभवांनंतर चौथ्या स्थानी असलेल्या पंजाब किंग्सची प्लेऑफ गाठण्याची शक्यता ५० टक्केपेक्षा कमी असून त्यांना कोणत्याही स्थितीत उर्वरित दोन सामने मोठ्या फरकाने जिंकणं गरजेचं आहे.

## राजस्थान रॉयल्स संघ प्लेऑफ गाठू

लखनौच्या पराभवामुळे पाचव्या स्थानी असलेल्या राजस्थान रॉयल्सला तगडा फायदा झाला आहे. आता पंजाब किंग्सपेक्षा राजस्थान प्लेऑफ गाठण्याची शक्यता ५१ टक्के आहे. राजस्थानचे अजून ३ सामने बाकी असून तिन्ही सामने जिंकल्यास संघ प्लेऑफ गाठू शकतो. तर लखनौने केलेल्या पराभवानंतर चेन्नईची प्लेऑफ गाठण्याची शक्यता २८ टक्के आहे. संघाने उर्वरित दोन सामने जरी जिंकले तरी इतर संघांच्या निकालांवरून आणि रन रेटवर त्यांना अवलंबून रहावं लागणार आहे. तर दिल्ली आणि केकेआरची प्लेऑफ गाठण्याची शक्यता फक्त ३-३ टक्के उरली आहे. म्हणजेच आता तिसऱ्या आणि चौथ्या स्थानासाठी हैदराबाद, राजस्थान व पंजाबमध्ये चुरस असणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार ।
दि. 17 मे 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# नवी सांगवीत ३ अनधिकृत आरसीसी बांधकामांवर कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**


पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ह क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत नवी सांगवी प्रभाग क्र. ३१ मध्ये अनधिकृत बांधकामांविरोधात निष्कासन कारवाई करण्यात आली. यामध्ये नेताजी नगर, गांगर्डे नगर, विनायक नगर आणि गजानन नगर परिसरातील अंदाजे १३० चौरस मीटर क्षेत्रफळावरील ३ अनधिकृत आर.सी.सी. बांधकामांचे निष्कासन करण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये तसेच ह क्षेत्रीय अधिकारी पूजा दुधनाळे यांच्या अधिपत्याखाली ही कारवाई पार पडली. या कारवाईमध्ये उप अभियंता प्रताप मोरे, कनिष्ठ अभियंता जयवंत रोकडे, महापालिका धडक कारवाई पथकातील बीट निरीक्षक रोहन कांबळे, प्रफुल्ल भोकरे, सुरज माने यांच्यासह १८ महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान उपस्थित होते. तसेच १० मजूर, १ जेसीबी आणि ३ ट्रॅक्टर ब्रेकर यांच्या सहाय्याने ही कारवाई करण्यात आली.

या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, अनधिकृत बांधकामांवर महापालिका प्रशासन कठोर भूमिका घेत असल्याचे स्पष्ट झाले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अशा बेकायदेशीर बांधकामांवर नियमितपणे कारवाई सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. संबंधित बांधकाम मालकांना यापूर्वी नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. मात्र, नियमांचे पालन न केल्यामुळे अखेर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली होती. महापालिकेच्या या धडक मोहिमेमुळे अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. भविष्यातही शहरातील विविध भागांमध्ये अशाच प्रकारच्या कारवाया अधिक तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

> पिंपरी चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांविरोधात महापालिका प्रशासनाची कारवाई यापुढेही सातत्याने सुरू राहणार आहे. नागरिकांनी कोणतेही बांधकाम करताना आवश्यक परवानग्या घेऊनच बांधकाम करावे आणि नियमांचे पालन करावे. अनधिकृत बांधकाम अथवा अतिक्रमण केल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.






# चिखली टाऊन हॉलला संत तुकाराम महाराजांचे नाव

## महापालिका महासभेत उपसूचनेस मंजुरी; नगरसेवक कुंदन गायकवाड सूचक, निखिल बोऱ्हाडे अनुमोदक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**टाळगाव चिखली येथील टाऊन हॉलला "जगद्गुरू संत तुकाराम महाराज टाऊन हॉल" असे नामकरण करण्याच्या उपसूचनेस पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या महासभेत मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे वारकरी संप्रदायाच्या सांस्कृतिक वारशाला सन्मान मिळाल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. महापौर रवि लांडगे यांनी या उपसूचनेला मंजुरी दिली आहे.**



> "टाळगाव चिखली ही संत परंपरेची भूमी आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा वारसा आणि त्यांच्या विचारांची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावी, या भावनेतून टाऊन हॉलला त्यांचे नाव देण्याची उपसूचना मांडली होती. महासभेने या प्रस्तावास मंजुरी दिल्याने गावाच्या सांस्कृतिक ओळखीला नवा सन्मान मिळाला आहे. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने हा टाऊन हॉल उभारण्यात आला. त्याला स्थानिक लोकप्रतिनिधींची साथ मिळाली. आता तुकोबांच्या नावाने हे संकुल ओळखले जाईल, याचा मनोमन आनंद आहे."
>
> **- कुंदन गायकवाड, नगरसेवक, भाजपा, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून टाळगाव चिखली येथे आधुनिक सुविधांनी सुसज्ज अशा टाऊन हॉलची उभारणी करण्यात आली आहे. स्थानिक नागरिकांसाठी सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांचे केंद्र ठरणारा हा टाऊन हॉल परिसराच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. टाळगाव चिखली हे गाव संत परंपरेशी जोडलेले असून, जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या आध्यात्मिक विचारांचा आणि सांस्कृतिक वारशाचा प्रभाव आजही येथे प्रकर्षाने जाणवतो. संत तुकोबांच्या अभंगवाणीतून समता, मानवता, भक्ती आणि समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात आला असून, त्याचा प्रभाव येथील सामाजिक वातावरणात आजही दिसून येतो.

स्थानिक परंपरा आणि श्रद्धेनुसार, संत तुकाराम महाराजांनी या गावात टाळ ठेवले होते. त्यामुळेच या गावाला "टाळगाव चिखली" हे नाव पडल्याची भावना ग्रामस्थांमध्ये आजही कायम आहे. या ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाचा गौरव जपण्यासाठी नव्याने उभारण्यात आलेल्या टाऊन हॉलला संत तुकाराम महाराज यांचे नाव देण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात आली होती. या मागणीमुळे परिसरातील नागरिकांच्या भावना आणि संत परंपरेप्रती असलेला आदर अधोरेखित झाला असून, भविष्यात हा टाऊन हॉल सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक जतन आणि विविध सार्वजनिक उपक्रमांचे प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या ठिकाणी विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. युवक आणि विद्यार्थ्यांसाठीही हा टाऊन हॉल प्रेरणादायी व्यासपीठ ठरणार आहे. स्थानिक कला, संस्कृती आणि परंपरा जतन करण्यासाठी या वास्तूचा मोठा उपयोग होईल. नागरिकांमध्ये एकात्मता आणि सामाजिक बांधिलकी वाढविण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण मानला जात आहे. टाळगाव चिखलीच्या ऐतिहासिक ओळखीला या टाऊन हॉलमुळे नवी दिशा आणि अधिक भक्कम ओळख मिळणार आहे.

### स्थानिक वारसा जतन करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय

महासभेत मंजूर झालेल्या या उपसूचनेनुसार, टाळगाव चिखली येथील टाऊन हॉल आता "जगद्गुरू संत तुकाराम महाराज टाऊन हॉल" या नावाने ओळखला जाणार आहे. स्थानिक वारसा जतन करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. ही उपसूचना भाजपा नगरसेवक कुंदन गायकवाड यांनी मांडली होती, तर नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी अनुमोदन दिले होते. या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून संत परंपरेला योग्य सन्मान मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# पीसीयूमध्ये फिडेल सॉफ्टटेकद्वारे स्पॉगल एआय डेटा ॲनालिटिक्स लॅब

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध व्हावे यासाठी पिंपरी चिंचवड विद्यापीठ मध्ये विद्यार्थी केंद्रबिंदू मानून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नामांकित कंपन्यांसोबत अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षण प्रणाली मध्ये उदयोन्मुख तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण करून विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. त्या अंतर्गत 'स्पॉगल एआय डेटा ॲनालिटिक्स लॅब'ची स्थापना करण्यासाठी फिडेल सॉफ्ट टेक सोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. हा करार एआय सक्षम विद्यापीठ बनण्याचा एक महत्त्वाचा टप्पा आहे अशी माहिती पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी दिली.**




आकुर्डी येथील ट्रस्ट कार्यालय मध्ये पीसीयू आणि फिडेल सॉफ्टटेक कंपनी यांच्या मध्ये सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, आयटी आणि आयटीइएस विभाग प्रमुख प्रा. रामकृष्ण वडाली आणि फिडेल सॉफ्टटेक लि. चे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील कुलकर्णी आदी उपस्थित होते. या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण, इंटर्नशिप आणि रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. उद्योग आणि शिक्षण क्षेत्र यांच्यातील दुवा अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वपूर्ण मानला जात आहे. विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट आणि आयटी क्षेत्रातील अत्याधुनिक कौशल्यांचे मार्गदर्शन मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

### 'स्पॉगल एआय डेटा ॲनालिटिक्स लॅब'ची स्थापना

या अत्याधुनिक लॅबमुळे विद्यार्थ्यांना एआय, डेटा ॲनालिटिक्स आणि मशीन लर्निंग क्षेत्रातील प्रत्यक्ष प्रशिक्षण मिळणार आहे. उद्योग क्षेत्राच्या गरजेनुसार कौशल्य विकासावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, लाईव्ह प्रोजेक्ट्स आणि संशोधनाच्या नव्या संधी उपलब्ध होतील. उद्योग आणि शिक्षण यांच्यातील दुवा अधिक मजबूत करण्यासाठी हा करार महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

> "पीसीयू मध्ये लवकरच फिडेल सॉफ्टटेक द्वारे स्पॉगल एआय डेटा ॲनालिटिक्स लॅब सेंटर सुरू होईल. विद्यार्थ्यांना प्रकल्प आणि उद्योग संबंधित साधनांद्वारे डेटा ॲनालिटिक्स, डेटा इंजिनिअरिंग आणि बिझनेस इंटेलिजन्समध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाईल. यात तज्ञांचे मार्गदर्शन, प्रशिक्षण, प्रात्यक्षिक, असाइनमेंट्स, मूल्यांकन आणि प्रमाणपत्रे यांचा समावेश आहे. या लॅब मुळे विद्यार्थ्यांना डेटा ॲनालिटिक्स, डेटा इनजेशन आणि इटीएल (एक्स्ट्रॅक्ट, ट्रान्सफॉर्म, लोड) प्रक्रिया, प्रिडिक्टिव्ह मॉडेलिंग आणि एआय मधील उच्च मागणी असलेल्या करिअरसाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यास मदत होईल."
>
> **- शांताराम गराडे, खजिनदार, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट.**

# दिघीतील उन्हाळी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## प्रशिक्षकांच्या विशेष मेहनतीतून खेळाडूंना शारीरिक तंदुरुस्ती व कौशल्य विकासाचे प्रशिक्षण

**महाईन्यूज ।**
पिंपरी- चिंचवड

**दिघी परिसरातील युवक आणि बालकांमध्ये व्यायामाची आवड, शिस्तबद्ध जीवनशैली आणि क्रीडाप्रेम निर्माण व्हावे या उद्देशाने कार्यक्षम नगरसेवक श्री. उदय दत्तात्रय गायकवाड तथा पुणे जिल्ह्याचे क्रीडा जिल्हाधिकारी श्री. जगन्नाथ लकडे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या उन्हाळी शारीरिक तंदुरुस्ती व कौशल्य विकास शिबिरास पालक व खेळाडूंकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**



दिनांक ५ मे ते १५ मे दरम्यान पार पडलेल्या या शिबिरात मोठ्या संख्येने युवक व बालकांनी सहभाग घेतला. आपल्या मुलांमध्ये व्यायामाची सवय, शिस्त, आत्मविश्वास आणि क्रीडांगणाची ओढ निर्माण व्हावी या सकारात्मक भावनेतून पालकांनीही मुलांना उत्साहाने शिबिरात सहभागी करून घेतले.

गेल्या अकरा दिवसांमध्ये हे शिबिर अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि शिस्तबद्ध नियोजनातून यशस्वीरित्या पार पडले. संपूर्ण शिबिराचे नियोजन व मार्गदर्शन श्री. अनिल घुले सर यांच्या देखरेखीखाली करण्यात आले. त्यांच्या नेतृत्वाखाली प्रशिक्षकांनी सहभागी खेळाडूंना शारीरिक तंदुरुस्ती, कौशल्य विकास, संघभावना आणि खेळातील शिस्त यांचे प्रभावी प्रशिक्षण दिले. शिबिरासाठी प्रशिक्षक म्हणून श्री. मोहन झुंजे पाटील, श्री. गणेश झगडे, श्री. विनोद वाळके, श्री. प्रमोद भोसले, श्री. अमित गमरे, श्री. राम रजक, श्री. संजय सूर्यवंशी, श्री. प्रल्हाद ठाकूर आणि श्री. अक्षय तापकीर यांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिराच्या समारोपावेळी सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना विशेष गौरविण्यात आले.



“ आजच्या पिढीला मोबाईल आणि स्क्रीनच्या आहारी न जाता मैदानाशी जोडणे ही काळाची गरज आहे. युवक आणि बालकांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, संघभावना आणि निरोगी जीवनशैली निर्माण व्हावी यासाठी नवजीवन स्पोर्ट्स फाउंडेशनच्या माध्यमातून भविष्यातही अशाच प्रकारचे शिबिर, स्पर्धा आणि क्रीडा उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील. प्रत्येक मुलगा-मुलगी खेळाकडे वळून सक्षम आणि सुदृढ नागरिक बनावा, हीच आमची भूमिका आहे.

- उदय गायकवाड, नगरसेवक, भाजपा.

### नवजीवन स्पोर्ट्स फाउंडेशनच्या माध्यमातून क्रीडा उपक्रम आयोजित

यावेळी नवजीवन स्पोर्ट्स फाउंडेशनच्या माध्यमातून भविष्यातही अशा प्रकारचे शिबिर, स्पर्धा आणि विविध क्रीडा उपक्रम सातत्याने आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. नव्या पिढीला सक्षम, सुदृढ आणि क्रीडामय बनविण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन योगदान द्यावे, असे आवाहनही करण्यात आले. दरम्यान, नवजीवन स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने सर्व पालक, खेळाडू, प्रशिक्षक आणि सहकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात आले.

# संत तुकाराम नगर येथील गर्ल्स हॉस्टेलसमोर संशयास्पद गिफ्ट बॉक्स

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहरातील संत तुकाराम नगर परिसरात शुक्रवारी रात्री घडलेल्या एका घटनेमुळे काही काळ भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. आकुर्डी परिसरातील डी वाय पाटील विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या राजे राजेश्वरी गर्ल्स हॉस्टेलच्या प्रवेशद्वारासमोर ठेवण्यात आलेल्या एका संशयास्पद गिफ्ट बॉक्समुळे विद्यार्थिनींमध्ये मोठी खळबळ उडाली. पुणे शहरात नुकत्याच घडलेल्या बॉम्बसदृश वस्तू ठेवण्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर या घटनेकडे अत्यंत गांभीर्याने पाहिले गेले.**



मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री सुमारे सव्वा आठच्या सुमारास हॉस्टेलच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ एक मोठ्या आकाराचा गिफ्ट बॉक्स आढळून आला. हा बॉक्स बराच वेळ तेथे पडून असल्याचे लक्षात आल्यानंतर सुरक्षा रक्षकाला संशय आला. बॉक्सवर कोणतेही नाव, ओळख किंवा माहिती नसल्याने परिस्थिती अधिकच संशयास्पद वाटू लागली. तत्काळ सतर्कता दाखवत सुरक्षा रक्षकाने पोलिसांना माहिती दिली.


घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिसरात नागरिकांची व विद्यार्थिनींची गर्दी होऊ नये म्हणून खबरदारीचा उपाय म्हणून काही वेळ परिसर रिकामा करण्यात आला. पोलिसांनी संपूर्ण परिसराची पाहणी करत बॉक्सभोवती सुरक्षेचा घेरा तयार केला. काही विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सोशल मीडियावरही या घटनेची माहिती वेगाने पसरू लागल्याने नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले होते.

### पोलिसांचे नागरिकांना आवाहन

या घटनेनंतर पोलिसांनी नागरिकांना पुन्हा एकदा आवाहन केले आहे की, सार्वजनिक ठिकाणी कोणतीही संशयास्पद वस्तू आढळल्यास ती स्वतः हाताळण्याचा प्रयत्न करू नये. तत्काळ पोलिस किंवा संबंधित सुरक्षा यंत्रणांना माहिती द्यावी. नागरिकांची सतर्कता आणि पोलिसांची तातडीची कारवाई यामुळे संभाव्य धोके टाळणे शक्य होते, असेही पोलिसांकडून सांगण्यात आले. शहरात वाढत्या सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर अशा घटनांकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक असल्याचे मत स्थानिक नागरिकांनी व्यक्त केले. सुदैवाने ही घटना निरुपद्रवी ठरली असली तरी, सुरक्षा व्यवस्थेची सतर्कता आणि तत्पर प्रतिसाद यामुळे कोणतीही अनुचित घटना घडली नाही. या प्रकारामुळे पुन्हा एकदा ‘सावधगिरी हाच सर्वोत्तम उपाय’ असल्याचे अधोरेखित झाले आहे.

### विविध ठिकाणी संशयास्पद वस्तू आढळल्याच्या घटना

विशेष म्हणजे, पुणे शहरात मागील काही दिवसांत विविध ठिकाणी संशयास्पद वस्तू आढळल्याच्या घटना समोर आल्यामुळे पोलिस प्रशासन कोणतीही जोखीम पत्करण्याच्या मनःस्थितीत नव्हते. त्यामुळे या घटनेची अत्यंत दक्षतेने हाताळणी करण्यात आली. पोलिसांनी बॉक्सची बारकाईने तपासणी सुरू केली. काही काळ परिसरात तणावपूर्ण शांतता निर्माण झाली होती. विद्यार्थिनींसह हॉस्टेल प्रशासनही चिंतेत होते. दरम्यान, पोलिसांनी सर्व खबरदारी घेत संशयित बॉक्स उघडून पाहिला असता त्यामध्ये टेडी बिअर असल्याचे समोर आले. कोणतीही स्फोटक किंवा धोकादायक वस्तू नसल्याचे स्पष्ट होताच उपस्थितांनी सुटकेचा निश्वास सोडला. काही क्षणांपूर्वी भीतीने व्यापलेल्या परिसरात नंतर हलकेफुलके वातावरण निर्माण झाले.


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
43 YEARS OF
NURTURING VALUES,
EXCELLENCE AND
TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade V
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in